सायं.दैनिक आवाज जनसामान्यांचा..
बीड
# किसान
• संपादक : शेख कामरान •

बीड ▪ वर्ष ५ ▪ अंक ४३ ▪ गुरुवार, दि. १९ जून, २०२५ ▪ पोस्टल दिनांक २० जून, २०२५ ▪ RNI : MAHMAR/2021/80738 ▪ Postal No. LSB/Beed/RNP-211/2024-2026 ▪ पाने ४ ▪ किंमत २ रु.
BEED ▪ Year-5 ▪ Issue-43 ▪ Thursday 19 June, 2025 ▪ Postal Date 20 June, 2025 ▪ RNI : MAHMAR/2021/80738 ▪ Postal No. LSB/Beed/RNP-211/2024-2026 ▪ Pages 4 ▪ Price 2

## निवृत्त कर्मचारी व उत्कृष्ट क्रिकेटपटू शेख उस्मान यांची गळफास घेऊन आत्महत्या








बीड (किसान न्युज): जिल्हाधिकारी कार्यालयातील निवृत्ती कर्मचारी व उत्कृष्ट क्रिकेटपटू उस्मान कादर शेख वय ७५ वर्ष यांनी रहात्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना आज सकाळी घडली. उस्मान शेख हे शहरातील काझी नगर भागात आपल्या कुटुंबा सोबत रहातात. आज सकाळी त्यांनी रहात्या घरीच गळफास घेऊन मृत्युला कवटाळले आहे. गळफास घेतल्याचा प्रकार लक्षात येताच त्यांना तातडीने जिल्हा रुग्णालयात आणण्यात आले मात्र तोपर्यंत खूप उशीर झाला होता. शवविच्छेदन करुन मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आला. या आत्महत्ये मागील कारण स्पष्ट झाले नाही.

# जि.प.च्या सोळुंकेंच्या शासकिय निवासाला ५३ लाखांची उधळपट्टी बापाचाच माल समजलाय; इथे लोकांना घरकुलाचे पैसे वेळेत मिळत नाहीत आणि या महाशयांनी दहा लाखाचा तर फक्त रंगच मारलाय!


## चोराच्या मनात चांदणं आहे त्यामूळेच ई-टेंडरला फाट्यावर मारुन सात तुकडे पाडून मजूर सोसयट्यांच्या माध्यमातून टाळूवरचे लोणी खाण्याचं काम यांनी केलं

**बीड । अदनान खान**

**जिल्हापरिषदेचे अतिरिक्त उपमुख्य कार्यकारी अधिकारी वासुदेव सोळूंके यांनी दोन घरांच्या दुरुस्तीसाठी तब्बल ५३ कोटींचा चुराडा केला असून, रंग आणि सरंक्षण भिंतीसाठी त्यांनी १९ लाख ६३ हजारांचा खर्च दाखविला तर इतर कामांसाठी अशीच अवाढव्य रक्कम खर्ची करण्यात आली. जे आकडे पाहून डोळे पांढरे होतील. यासाठी सात तुकडे पाडून ऑफलाईन टेंडर करुन हा घोटाळा करण्यात आला. यामुळे शासन एका बाजूला पूर्ण घर बांधण्यासाठी दीड ते अडीच लाख दे असताना दुरुस्तीसाठी अर्धा कोटी कसे असा प्रश्न सामान्य जनतेतून विचारला जात आहे.**

प्रशासनातील घोटाळे अन् त्यांची पद्धत पाहून सामान्य माणूस चक्रावून जातो. पण शासन आणि प्रशासनाची यासाठी युती असल्याने या सामान्य माणसाने तक्रार केली तरी ती ऐकून घेतो कोण? हा प्रश्न आहे. बीड जिल्हापरिषद अंतर्गत आता शिक्षण भरती नंतर निवासस्थान दुरुस्तीचा मोठा घोटाळा उघडकीस आला. जिल्हापरिषदेचे अतिरिक्त उपमुख्य कार्यकारी अधिकारी वासुदेव सोळूंके यांचे जुनी पंचायत समिती परिसराती निवासस्थानाची सन २०२०-२१ मध्ये दुरुस्ती केल्यानंतर पुन्हा २०२१-२२ मध्येही याच दोन गाळे १ व २ आणि कुठे अ आणि ब असा खेळ करुन दुरुस्ती केली. यासाठी थोडे थोडके नव्हे तर बापाचे पैसे असल्यासारखे तब्बल जवळपास ५३ लाख रुपये खर्च करण्यात आले. » पान २ वर



### अशी आहेत कामे अन् रक्कम

रंगरंगोटी,मल निसारण ९ लाख ८१ हजार
जोते संरक्षण, सुशोभीकरण ४ लाख ९१ हजार
फरशी, पेव्हर ब्लॉक ९ लाख ८२ हजार
दोन निवासस्थान क्र १ व २ ९ लाख ८१हजार
संरक्षण भिंत व गेट ९ लाख ८१ हजार
बंदीस्त नाली बांधकाम ५ लाख ८८ हजार
दुरुस्ती २ लाख ४९ हजार

# ट्रॅव्हल्स-दुचाकीचा अपघात; दोन ठार केज तालुक्यातील होळ येथील घटना

**केज । किसान न्युज**

अंबाजोगाई येथून केजच्या दिशेने चाललेल्या ट्रॅव्हल्स व दुचाकीची धडक होऊन घडलेल्या अपघातात दुचाकीवरील दोघेही ठार झाल्याची घटना बुधवारी (दि.१८) रात्री होळ (ता.केज ) येथे घडली आहे. दत्तात्रय बबन फुगारे (वय ३५ वर्ष) रा. होळ (ता. केज), संतोष भडके (वय ३२ वर्ष) रा. मोरवड ता. रेणापूर (जि.लातूर) असे मयतांची नावे आहेत. संतोष भडके हा दत्तात्रय फुगारे यांच्या शेतात सालगडी म्हणून कामास असून, हे दोघे बुधवारी रात्री दुचाकी क्र. एम.एच.४४ एन ८४१८ वर बसून हॉटेलवर जेवण्यासाठी गेले होते. जेवण



करुन परत शेतात येताना अंबाजोगाई कडून केजच्या दिशेने चाललेली ट्रॅव्हल्स क्र. एम.एच. २४ ए टी ९९०० याने दुचाकीला जोराची धडक दिल्याने घडलेल्या अपघातात दुचाकीवरील दोघेही ठार झाले. याप्रकरणी अद्याप पोलिसात नोंद नाही. या घटनेने होळ येथे हळहळ व्यक्त केली जात आहे.

# नेकनूरचे बाजारतळ बनले डंपिंग ग्राउंड

### शहरभर अस्वच्छतेचा कळस; लोकप्रतिनिधी, ग्रामपंचायत प्रशासनाचे दुर्लक्ष

**येळंब घाट । किसान न्युज**

बीड तालुक्यातील ग्रामीण भागातील सर्वात मोठ्या बाजारपेठेचे गाव असलेल्या नेकनूरात सध्या सर्वत्र कचऱ्याचे साम्राज्य पसरले आहे. विशेष म्हणजे बाजारतळावरही ठिकठिकाणी कचऱ्याचे ढिगारे पसरले असून दुर्गंधीमुळे नागरिकांवर तोंडाला रूमाल



बांधून बाजार करण्याची वेळ येत आहे. त्यामुळे ग्रामपंचायत करते तरी काय ? असा सवाल निर्माण होत आहे. तालुक्यातील नेकनूर ग्रामपंचायत ही तालुक्यातील सर्वात मोठ्या ग्रामपंचायतींपैकी एक असून गाव अहिल्यानगर-अहमदपूर » पान २ वर महामार्गावर वसलेले आहे.

# अपघातग्रस्त दोन शेतकरी कुटुंबियांना मिळाला प्रत्येकी २ लाख रुपये विमा

### होळचे महाराष्ट्र ग्रामीण बँकेचे शाखा व्यवस्थापक राहुल सावंत यांची माहिती

**केज । किसान न्युज**

दि.१९ : तालुक्यातील होळ येथील अपघातग्रस्त दोन शेतकरी कुटुंबियांना प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजनेअंतर्गत प्रत्येकी २ लाख रुपये विमा लाभ मिळाला आहे, अशी माहिती महाराष्ट्र ग्रामीण बँकेचे शाखा व्यवस्थापक राहुल सावंत यांनी दिली आहे. मधुकर दत्तोबा खाडे, अशोक विठ्ठल शिंदे अशी मयत शेतकऱ्यांची नावे आहेत.

प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजनेअंतर्गत महाराष्ट्र ग्रामीण बँकेमध्ये २० रुपयांचा वार्षिक विमा काढला होता. त्यामुळे त्यांचा अपघाती मृत्यू झाल्यामुळे वारसाला २ लाख रुपये विमा मिळाला आहे. मृत्यू झाल्याची माहिती मिळाल्यानंतर बँकेचे शाखा व्यवस्थापक राहुल सावंत यांनी त्वरीत क्लेम सादर करून वारंवार पाठपुरावा करून मयत शेकऱ्यांच्या वारसांना २ लाख रुपये मिळवून दिले. श्री.सावंत यांना सहायक शाखा व्यवस्थापक ज्ञानेश्वर बिराजदार, लिपिक पल्लवी गवांडे, सटवा मेंढके यांनी सहकार्य केले. दरम्यान, दोन्ही मयत शेतकऱ्यांच्या वारसांच्या खात्यावर थेट रक्कम जमा झाली आहे.



# राज्यातील ‘आशा’ ची दशा थांबवा : खासदार सोनवणे

### प्रोत्साहन मानधन वेळेत द्यावीत केंद्रीय आरोग्य राज्यमंत्र्यांकडे मागणी

**बीड । किसान न्युज**

महाराष्ट्रातील आशा स्वयंसेवक आणि गट सुविधाकर्त्यांवर अनेक जबाबदारी दिल्या जात आहेत. दिलेल्या जबाबदारी पार पाडण्यासाठी ते प्रमाणिकपणे काम करत आहेत. असे असताना राज्यातील आशा वर्कर्सचे जानेवारी ते मे पर्यंतचे त्यांचे प्रोत्साहन मानधन प्रलंबित आहे असून त्यांना तातडीने प्रोत्साहन मानधन देण्यात यावे, असे पत्र खा.बजरंग सोनवणे यांनी केंद्रीय आरोग्य आणि कुटूंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांना दिले आहे. खा.बजरंग सोनवणे यांनी आपल्या पत्रात म्हटले आहे, राष्ट्रीय आरोग्य अभियान (एनएचएम) अंतर्गत महाराष्ट्रात काम करणाऱ्या ७० हजारहून अधिक आशा कार्यकर्त्या आणि ३,५०० हून अधिक गट सुविधाकर्त्यांचे प्रोत्साहन थांबविणे गंभीर चिंतेचा विषय आहे. सार्वजनिक आरोग्य सेवा व्यवस्थेचा कणा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या आघाडीच्या कर्मचाऱ्यांना- » पान २ वर

# शेतात रहाणाऱ्या वृद्ध दांपत्याला मारहाण करुन चोरी

### अंगावरील दागिने ओरबाडून घेताना महिलेचा फाटला कान;७३ हजाराचा ऐवज लंपास

**केज । किसान न्युज**

तालुक्यातील लाडेवडगाव शिवारात एका वयोवृद्ध दांपत्याच्या आडस-अंबाजोगाई रस्त्यावरील शेतातील शेडमध्ये घुसून चौघा चोरट्यांनी तब्बल ७३ हजार रुपयांचा ऐवज जबरदस्तीने हिसकावून नेल्याची घटना घडली. या घटनेत महिलेचा कान फाटून गंभीर इजा झाली आहे. या घटनेने शेतात रहाणाऱ्या शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. याप्रकरणी समाबाई तुकाराम लाड (वय ८०) यांनी पोलिसात दिलेल्या तक्रारीनुसार मागील दोन दिवसांपासून त्या आपल्या पतीसोबत लाडेवडगाव शिवारातील अडीच एकर शेतात, पत्र्याच्या शेडमध्ये राहत होत्या. दि. १७ जून २०२५ च्या रात्री १ ते २ वाजेच्या सुमारास शेडबाहेर झोपलेल्या त्यांच्या पतीला काही अनोळखी व्यक्तीने » पान २ वर

# जितीन रहमान यांनी पदभार स्वीकारला

**बीड । किसान न्युज**



जिल्हा परिषदेचे नूतन सिइओ जितीन रहमान यांनी गुरुवारी पदभार स्वीकारला. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी वासुदेव सोळंके यांनी त्यांचे स्वागत केले. बीड जिल्हा परिषदेचे सिइओ आदित्य जिवने यांची मागील आठवड्यात बदली झाली. त्यांच्या जागी नियुक्ती झालेले एम मुरुंगनाथम यांनी येण्यासाठी नकार दिला. त्यानंतर वर्धा जिल्हा परिषदेचे सिइओ जितीन रहमान यांची नियुक्ती करण्यात आली. रहमान यांनी गुरुवारी १९ जुन रोजी पदभार स्वीकारला. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी सोळंके यांनी त्यांचे पुष्पगुछ देऊन स्वागत केले.

# ठेवीदारांच्या मृत्यूचा आकडा वाढल्यावर निगरगट्ट प्रशासनाला जाग येणार का ? : उबाळे

### गेवराईत छत्रपती मल्टिस्टेटसमोर गळाफास घेऊन शेतकऱ्याने संपविले जीवन

**बीड । किसान न्युज**

जिल्ह्यातील दिवाळखोरीत निघालेल्या मल्टिस्टेट, पतसंस्थांमध्ये मेहनतीचा पैसा अडकल्याने आर्थिक विवंचनेत सापडलेल्या ठेवीदारांनी मृत्यूला जवळ केले आहे. गेवराई तालुक्यातील खळेगाव येथील शेतकऱ्याने आज आत्महत्या करुन जीवन संपविले. या मल्टिस्टेटवाल्यांनी जिल्ह्यात आणखी एकाचा बळी घेतला आहे. ठेवीदार जीव देत आहेत, मात्र निगरगट्ट प्रशासन केवळ



कागदोपत्री कारवाई करत असून ठेवीदारांच्या मृत्यूचा आकडा वाढल्यावर प्रशासनाला जाग येणार का ? असा सवाल स्वाभिमान संघटनेचे जिल्हाध्यक्ष तथा महाराष्ट्र राज्य ठेवीदार कृती समितीचे राज्य समन्वयक प्रा.सचिन उबाळे यांनी केला आहे. दरम्यान, ठेवीदारांनी संयम बाळगावा. कितीही आर्थिक अडचणी आल्या तरी टोकाचा निर्णय घेऊ नये. ठेवीदारांना ठेवी परत दिल्याशिवाया शांत बसणार नाही असेही प्रा.उबाळे यांनी म्हटले आहे. जिल्ह्यातील ज्ञानराधा मल्टीस्टेट,छत्रपती मल्टिस्टेट, साईराम मल्टीस्टेट, राजस्थानी मल्टीस्टेट (पतसंस्था), जिजाऊ मल्टीस्टेट, शुभ कल्याण मल्टीस्टेट, मातोश्री अर्बन, लक्ष्मीमाता » पान २ वर

स्थानिक सोने चांदीचे भाव..
पंकज ज्वेलर्स
पिंगळे गल्ली, कारंजा रोड, बीड
9850643058
सोने २४ कॅरेट 98,700
२२ कॅरेट 96,000
चांदी प्रतिकिलो 107,000